# विरोधकांना न्याय देण्याचा प्रयत्न करेन! उपसभापतिपदी बिनविरोध निवडीनंतर सचिन अहिर यांची ग्वाही

प्रतिनिधी २ जुलै



**मुंबई :** विधान परिषदेच्या उपसभापतिपदाची निवडणूक प्रक्रिया बुधवारी पार पडली. या पदासाठी महायुतीकडून सचिन अहिर यांच्या नावाचे तीन तर, महाविकास आघाडीकडून ज. मो. अभ्यंकर यांचा एक, असे चार प्रस्ताव सादर करण्यात आले होते. राजकारणात काही अपरिहार्य निर्णय घ्यावे लागतात. तो घेतला नसता तर माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता उपसभापतिपदी पोहोचला नसता. अगदी कालपर्यंत मी विरोधी पक्षात होतो आणि आता त्यांची साथ सोडल्याने काहीशी नाराजी असणे स्वाभाविक आहे. परंतु, माझ्या उपसभापतिपदाच्या कारकीर्दीच्या माध्यमातून मी त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करेन', अशी ग्वाही विधान परिषदेच्या उपसभापतिपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर सचिन अहिर यांनी व्यक्त केली. सभापती राम शिंदे यांनी ही निवडणूक जाहीर केल्यावर संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी अभ्यंकर यांचा प्रस्ताव सादर करणाऱ्या अंबादास दानवे यांच्याशी माझे बोलणे झाले असून, निवडणूक बिनविरोध होण्यास त्यांनी संमती दर्शविल्याचे सभागृहात सांगत, अनिल परब यांना हा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केली. परब यांनी ती मान्य करत परिषदेच्या परंपरेला साजेशी बिनविरोध निवडणूक व्हावी अशी इच्छा व्यक्त करत प्रस्ताव मागे घेत असल्याचे जाहीर केले. त्यास अभिजीत वंजारी यांनी अनुमोदन दिल्याचे जाहीर केल्यानंतर ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर अहिर यांच्या नावाचे तिन्ही प्रस्ताव मांडण्यात आले. प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आले. सचिन अहिर यांना एकनाथ शिंदेंकडून गिफ्ट; उपसभापती पदाबाबत नीलम गोऱ्हे थेट बोलल्या. सभापती राम शिंदे यांनी अहिर यांची उपसभापतिपदी निवड झाल्याचे जाहीर केल्यावर सर्व आमदारांनी बाके वाजवून त्यांचे स्वागत केले. 'अहिर या नावाचा अर्थ गोपालक तसेच निर्भीड असा होतो, सचिन अहिर हेसुद्धा राजकारणातील निर्भीड कार्यकर्ते आहेत', असे कौतुकोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिर यांचे अभिनंदन करताना काढले. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विरोधी पक्षांनी मोठे मन दाखविल्याने त्यांनी विरोधकांचेही आभार मानले. तसेच, अहिर हे कायदेशीर पद्धतीने उपसभापती झाले असून, आता इतर सर्व प्रश्न गौण आहेत, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या आमदारकीच्या वैधतेविषयी विरोधकांना उत्तर दिले. लोकांच्या सुख-दुःखात धावून जाणे, त्यांच्या व्यथा-वेदना समजून घेणे आणि स्वतःच्या इच्छा-आकांक्षांपेक्षा समाजाला प्राधान्य देणे यामुळेच लोक त्यांना नेता म्हणून स्वीकारतात', असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगत 'आपल्या माणसाचा सन्मान झाला' अशी मुंबईकरांची भावना असल्याचे नमूद केले. 'आमच्या संघात आता आणखी एक 'ऑलराऊंडर' आला आहे. गोलंदाज कोणताही असो, चेंडू कितीही वेगवान असो, सचिन अहिर हे षटकार मारल्याशिवाय थांबत नाहीत. जसे क्रिकेटमध्ये सचिन तेंडुलकर दिग्गज आहेत, तसेच राजकारण आणि समाजकारणात सचिन अहिर हेही आपल्या क्षेत्रातील दिग्गज आहेत. एक सचिन क्रिकेटमधून निवृत्त झाला, तर दुसऱ्या सचिनने जबाबदारीचे पॅड बांधून नव्या डावाला सुरुवात केली आहे' अशा शब्दांत शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. 'अहिर यांचे अजित पवार आणि पवार कुटुंबाशी गेले तीन दशकांचे जिव्हाळ्याचे संबंध असून, अहिर यांच्यातील गुण हेरून तरुण वयात त्यांना अजितदादांनी नवनव्या जबाबदाऱ्या राष्ट्रवादीत दिल्या होत्या. त्याचे त्यांनी राजकीय जीवनात सार्थक केले', असे कौतुकोद्गार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काढले. अभिनंदनाच्या प्रस्तावावर बोलताना राम शिंदे यांनी अहिर यांना आता फलंदाजी करण्याची बॅट खाली ठेवून पंचाची हॅट डोक्यावर चढविण्याचा सल्ला दिला. तसेच, परिषदेच्या उज्ज्वल परंपरेचा अहिर एक भाग झाल्याचे नमूद केले. अभिनंदनाच्या प्रस्तावावर उत्तर देताना अहिर यांनी आपल्या संघर्षमय आयुष्याचा पट मांडला. राजकीय समीकरणे बदलली तरी कष्टकरी, कामगार, वंचितांशी असलेली बांधिलकी ही कायमच राहणार, अशी ग्वाही त्यांनी दिली. कोळशातून हिरा शोधावा त्याप्रमाणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मला शोधून काढले, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी आपल्याला भरभरून दिले. त्यांच्याविषयी काहीही तक्रार नाही, असेही ते म्हणाले. विधान परिषदेत विरोधी पक्षनेतेपद द्यायला हवे, अशी भूमिका अहिर यांनी मांडली. 'विरोधी पक्षनेतेपद दिले असते तर इतके रामायण घडले नसते. तो लोकशाहीचा कणा आहे', असे अहिर हे संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांना उद्देशून म्हणाले. 'तुम्ही एकदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलून त्यावर निर्णय घ्या, मीदेखील शब्द टाकतो आणि हा विषय तडीस लावा', असे ते पाटील यांना म्हणाले.

# राज्यात पुढील 72 तास अतिमुसळधार पाऊस, हवामान विभागाचा धडकी भरवणारा इशारा

**मुंबई :** २० जून पर्यंतचा कालावधी राज्यात कोरडाच गेला होता. या काळात पाऊस न पडल्याने चिंता वाढली होती. परंतु २० जूननंतर महाराष्ट्रात पावसाने दमदार हजेरी लावल्याचं चित्र आहे. २० जून पासून राज्यात पावसाचा जोर वाढला आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस सुरू आहे. दरम्यान भारतीय हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्यानुसार पुढील चार दिवसांमध्ये आता राज्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे. राज्यात पाऊस धुमाकुळ घालणार आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाकडून राज्यतील काही भागांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे, तर काही जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून काही जिल्ह्यांमध्ये थेट रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार दोन जूनला पालघर जिल्ह्यात मुसळधार पावासाचा इशारा देण्यात आला आहे, तर तीन आणि चार जून रोजी पावसाचा जोर आणखी वाढणार असून, या पार्श्वभूमीवर जिल्ह्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यात अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. दुसरीकडे ठाणे जिल्ह्याला देखील पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून, पुढील चार दिवस जिल्ह्यात अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. मुंबईमध्ये देखील आता पावसाचा जोर आणखी वाढणार असून, दोन ते पाच जूनदरम्यान अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. रायगडला दोन जून रोजी ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून, तीन जून रोजी जिल्ह्यात पाऊस धुमाकुळ घालणार आहे. जिल्ह्याला पावसाचा थेट रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

# बुलेट ट्रेन प्रकल्पात 'टनेल हुड'चा वापर; हवेचा दाब, आवाज नियंत्रित करण्यास होणार मदत

**मुंबई:** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील डोंगराळ बोगद्यांच्या प्रवेशद्वारांवर टनेल हूड्स बसविण्यात येत आहेत. भारतात प्रथमच रेल्वे बोगद्यांसाठी अशा प्रकारचे टनेल हूड तंत्रज्ञान विकसित करून अंमलात आणण्यात आले आहे. बुलेट ट्रेन आव्हानात्मक प्रदेशातून जात असून, महाराष्ट्रात सात डोंगराळ बोगदे आणि गुजरातमध्ये १ डोंगराळ बोगदा आहे. या सर्व बोगद्यांच्या दोन्ही टोकांना टनेल हूड्स बसविण्यात येत आहेत.



जेव्हा उच्च वेगाची रेल्वे बोगद्यात प्रवेश करते, तेव्हा ती आपल्या पुढील बाजूस मोठ्या प्रमाणात हवा ढकलते. ही प्रक्रिया सिलिंडरमधील पिस्टनच्या हालचालीसारखी असते. हवेच्या या अचानक संकुचनामुळे दाब लहरी (प्रेशर वेव्ह्स) निर्माण होतात. ज्या बोगद्यामधून प्रवास करतात.

या दाब लहरींचे योग्य व्यवस्थापन न केल्यास रेल्वे बोगद्यातून बाहेर पडताना मोठा धडधडणारा आवाज निर्माण होऊ शकतो. टनेल हूड्स खुले वातावरण आणि मर्यादित बोगदा क्षेत्र यांमधील संक्रमण क्षेत्र म्हणून कार्य करतात. हवा अधिक हळूहळू आत-बाहेर जाऊ देऊन ते दाबातील बदल नियंत्रित करण्यास मदत करतात.उच्च-वेगाच्या रेल्वेगाड्या बोगद्यातून बाहेर पडताना निर्माण होणारा टनेल बूम आणि आवाज कमी करणे.

**आसपास होणारा त्रास कमी करणे.**

अतिउच्च वेगाने धावणाऱ्या रेल्वेगाड्यांच्या सुरक्षित आणि कार्यक्षम संचालनास साहाय्य करणे. टनेल हूड रेल्वेगाडी आणि हवेतील परस्पर समायोजन अचानक होण्याऐवजी हळूहळू होण्यास मदत करते. ज्यामुळे उच्च-वेगाच्या रेल्वेचा प्रवास शांत, सुरळीत आणि आरामदायी बनतो. रेल्वेगाडी बोगद्यात प्रवेश करताना संकुचित झालेल्या हवेचा काही भाग खिडक्यांमधून हळूहळू वातावरणात बाहेर पडू शकतो. यामुळे दाबलहरींची तीव्रता कमी होते. टनेल बूम कमी होतो आणि हवेचा प्रवाह अधिक सुरळीत राहण्यास मदत होते.

# होमिओपॅथी उपचार पद्धतीचे जनक सॅम्युएल हानेमान!



आज पुण्यतिथी

**होमिओपॅथीचा पाया**

निरोगी माणसाच्या शरीरात जे आजाराचे लक्षण निर्माण करण्याची ताकद औषधात असते, तेच औषध आजारी माणसाला दिल्यास त्याचा आजार बरा होतो, हा सिद्धांत डॉ. सॅम्युएल यांनी मांडला. त्यांनी औषधशास्त्रावर अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. 'ऑर्गॅनॉन ऑफ मेडिसिन' हा होमिओपॅथीचा पाया मानला जाणारा त्यांचा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. वैद्यकीय शिक्षणासोबतच त्यांना इंग्रजी, फ्रेंच, इटालियन अशा अनेक भाषा अवगत होत्या, ज्याचा उपयोग त्यांनी वैद्यकीय पुस्तकांच्या भाषांतरासाठी केला.

ख्रिश्चन फेड्रिक स्यॅमुएल हानेमान यांचा जन्म १० एप्रिल १७५५ रोजी तर निधन २ जुलै १८४३ मध्ये झालेरु ते एक जर्मन वैद्यक होते. त्यांनी होमिओपॅथी या वैद्यकीयशास्त्राचा शोध लावला. १७८४ मध्ये तरुण वयातच त्यांना ड्रेसडेन येथे सर्जन जनरलची जागा मिळाली. त्यांनी त्यावेळी जुनाट व्रणरोगावर एक अपूर्व ग्रंथ लिहिला व हाडांच्या व्रणावर एक नवीन औषधी प्रक्रिया बसवली. सन १७९२ च्या आधी त्यांनी फ्रेंच, इंग्लिश व इटालीयन भाषांतून निरनिराळ्या १८ वैद्यक ग्रंथाचे भाषांतर केले, १७८४ मध्ये त्यांनी जुन्या आजारावर एक अपूर्व ग्रंथ लिहिला, या ग्रंथात त्यांनी असाध्य समजल्या जाणाऱ्या जुन्या रोगांवर जलोपचार व मसाजने मालिश करून रोगाचे हरण करण्याची पद्धतीबाबत माहिती दिली आहे. होमिओपॅथीचा शोध लावण्यापूर्वी स्यॅमुएल हानेमान याने केलेल्या प्रयोगांत त्याला बार्क ऑफ चायना म्हणजे सिंकोना नावाच्या वनस्पतीचा रस प्यायल्यावर स्वतःमध्ये मलेरियाची लक्षणे दिसून आली होती. परंतु सिंकोना हे औषध मलेरिया रोग बरा करण्यासाठी वापरत असत. रसामध्ये घातलेले पाणी औषधाचे गुणधर्म स्मरणात ठेवून त्याप्रमाणे रुग्णास गुण देत असले पाहिजे असा हानेमानाने तर्क केला.

स्यॅमुएल हानेमान यांना रसायनशास्त्राचे उत्तम ज्ञान होते. त्यांनी या विषयावर पुष्कळ लेख लिहिले आहेत. त्यांनी १७९३ व १७९९ च्या दरम्यान औषधी शास्त्रविषयक बरेच नवे ग्रंथ लिहिले. तेव्हापासून त्यास वैद्यकशास्त्रात प्रमाणभूत मानू लागले. १८१० साली ते लैप्झीक शहरी आले आणि होमिओपथिक औषधांचाच व्यवसाय करु लागले. १८१२ साली त्यांना लैप्झीक युनिव्हर्सिटीच्या वैद्यक शास्त्रावरील प्रोफेसरची जागा मिळाली आणि त्यांचा व्यवसाय फार जोमाने वाढू लागला. हे पाहून त्यांचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळे तेथील सर्व अ?लोपॅथिक लोक व केमिस्ट लोक एकवटले आणि त्यांनी स्यॅमुएल हानेमान यांच्यावर १८२० मध्ये एक खटला केला. जर्मनीत त्या वेळी असा कायदा होता की, डॉक्टर लोकांनी डिस्पेन्स (औषध) तयार करावे. हानेमान साहेब एम.डी. पास झालेले डॉक्टर असल्यामुळे त्यांनी औषध तयार करणे हे त्यावेळच्या कायद्याच्या विरुद्ध होते. म्हणून त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला व त्यांना औषध तयार करणे व देणे यावर बंदी घालण्यात आली. यानंतर स्यॅमुएल हानेमान यांनी लैप्झीक सोडले आणि ऑस्ट्रिया येथील अनाल्ट कोएथन येथे गेले. तेथे ड्यूक फर्डिनंड यांनी त्यांना त्यांच्या राज्यात होमिओपथिक औषधे तयार करण्याचा अधिकार दिला व पुढे त्यांच्या औषधांनी रोग्यास उत्तम गुण आल्याचे पाहून १८२२ मध्ये त्यास राज्यमंत्री ही पदवी दिली. डॉ. सॅम्युएल हानेमान यांनी 'होमिओपॅथी' या वैद्यकीय उपचार पद्धतीचा शोध लावला. त्यांचा जन्म १० एप्रिल १७५५ रोजी जर्मनीमधील मेसेन (शगेह) या गावी झाला. दरवर्षी त्यांचा जन्मदिवस जागतिक होमिओपॅथी दिन म्हणून साजरा केला जातो.तत्कालीन ॲलोपॅथीच्या उपचार पद्धतींनी (जसे की जळवा लावून रक्त काढणे) रुग्ण बरे होण्याऐवजी जास्त त्रास होत असल्याचे पाहून ते असमाधानी होते. १७९० मध्ये, 'सिंकोना' (पेरुवियन बार्क) या मलेरियावरील औषधाच्या प्रयोगावरून त्यांना 'काट्याने काटा काढणे' हे होमिओपॅथीचे मूळ तत्त्व सापडले. अशा या महान डॉक्टरांचे २ जुलै १८४३ रोजी पॅरिस येथे त्यांचे निधन झाले.

# आई होण्याचं स्वप्न अधुरंच राहिलं, 8 महिन्यांच्या गर्भवतीचा मृत्यू

प्रतिनिधी २ जुलै

**मुंबई :** आरोग्य व्यवस्थेत सुधारणा करावी, अशी मागणी नेहमीच केली जाते. ग्रामीण भागात तर शासकीय रुग्णालयांची स्थिती अतिशय गंभीर आहे. रुग्णायातील स्वच्छतागृहे, उपचाराची व्यवस्था, रुग्णालयातील यंत्रणा अशा अनेक प्रकारच्या अडचणीत राज्यातील रुग्णव्यवस्था अडकलेली आहे. अनेक ठिकाणी रुग्णालयांत पुरेसे कर्मचारी नाहीत. काही दिवसांपूर्वी हिंगोली जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली होती. तेथे गरोदर मातेला रुग्णवाहिका नाकारण्यात आली होती. प्रवासासाठी डिझेल नसल्याचे कारण त्यावेळी देण्यात आले होते. परिणामी वेळेवर रुग्णवाहिका न मिळाल्याने संबंधित गर्भवती महिलेच्या पोटातच बाळ दगावले होते. आता अशाच प्रकारची गंभीर आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. नवी मुंबईतील ऐरोलीच्या शासकीय रुग्णालयात निष्काळजीपणामुळे एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाला आहे. तर दुसऱ्या गर्भवती महिलेची प्रकृत गंभीर आहे.

नेमकं काय घडलं?

मिळालेल्या माहितीनुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली येथील रुग्णालयातील कथित निष्काळजीपणामुळे ८ महिन्यांच्या गर्भवती सोनम डोंगरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच दुसऱ्या गर्भवती रिचा मिश्रा यांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दोघींची प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्यांना ऐरोली मनपा रुग्णालयातून वाशी येथील मनपा संदर्भ रुग्णालयात हलविण्यात आले. इंजेक्शनच्या दुष्परिणामामुळे ही गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप केला जात आहे. या दाव्यांची सखोल आणि निष्पक्ष चौकशी व्हावी अशी मागणी केली जात आहे. गेली अनेक वर्षे नवी मुंबईकरांना अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्याचे दावे केले जात आहेत. मात्र, जर अशा प्रकारच्या घटना घडत असतील, तर त्याची जबाबदारी कोणाची ह्याचे उत्तर नवी मुंबईकरांना मिळालंच पाहिजे, असी भावना व्यक्त केली जातेय. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय, निष्पक्ष आणि तत्काळ चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या कोणालाही सोडले जाता कामा नये, अशी मागणी केली जातेय. नवी मुंबईकरांच्या आरोग्याशी तडजोड अजिबात सहन केली जाणार नाही. न्याय मिळालाच पाहिजे अन्यथा मनसे आरोग्य विभागाच्या अधिकारी ह्यांच्या कार्यलयाची एकही काच शाबूत ठेवणार नाही, असा इशाराच मनसेचे नेते गजानन काळे यांनी दिला.

# एकनाथ शिंदेंनी अनिल परब-मिलिंद नार्वेकर यांना हात मिळवला; सचिन अहिर यांच्यासमोर काय घडलं?



प्रतिनिधी २ जुलै

**मुंबई :** सचिन अहिर यांची विधान परिषदेचे उपसभापती म्हणून निवड करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार देखील उपस्थित होत्या. सचिन अहिर यांची एकमताने निवड होताच सभागृहात अहिर यांचं कौतुक करण्यात आलं. मात्र याचवेळी एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे आमदार अनिल परब आणि मिलिंद नार्वेकर यांना हात मिळवल्याचे दृश्यही पाहायला मिळाले. सभागृहात खेळीमेळीचे वातावरण होते. राजकीय कटुता बाजूला ठेवून एकमेकांशी हस्तांदोलन करताना तसेच विरोधकांच्या टिप्पणीवर सत्ता पक्षाचे नेते खळाळून हसताना त्यांना दाद देताना सभागृहात दिसले. उपसभापती सचिन अहीर यांनी देखील अभिनंदनाचा स्वीकार केला.

# देशातील सर्वात मोठी अन् विश्वासार्ह बँक 'एसबीआय'!

## 1 जुलैला झाली होती बँकेची स्थापना

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत बँक ही महत्त्वाची संस्था असते. एखाद-दुसऱ्या दिवसासाठी जरी बँकांचे व्यवहार बंद राहिले, तरी देशाची आर्थिक व्यवस्था खीळ घातल्यासारखी होते. देशाच्या आर्थिक प्रगतीत त्या देशातील बँकांचा फार मोठा सहभाग असतो. बँकांच्या विकासासोबतच देशाचा विकास घडून येतो. त्यादृष्टीने भारतीय बँकांचा प्रवास व विकास कसा झाला हे महत्त्वाचे ठरते. देशातील सर्वात मोठी आणि सर्वात विश्वासार्ह बँक कोणती? या प्रश्नाला भारतीय स्टेट बँक हे उत्तर येतं. स्टेट बँक ऑफ इंडियाला २०० वर्षांहून अधिक दिवस झाले आहेत. आज ही देशातील सर्वात मोठी बँक आहे. मात्र, इथंपर्यंत पोहोचण्याची बँकेची कहाणी खूप रंजक आहे. आज १ जुलै हा या बँकेचा स्थापना दिवस आहे. शाखा आणि कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेतल्यास स्टेट बँक जगातील सर्वात मोठी बँक आहे. भारतीय स्टेट बँक ही सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक आहे. या बँकेला हे नाव १९५५ मध्ये मिळाले. परंतु आज बँक ज्या शिखरावर पोहचली आहे. याचा प्रवास २ शतकाहून अधिक जुना आहे. या बँकेच्या स्थापनेचा प्रवास १८०६ सालापासून सुरू होतो. बँक ऑफ कलकत्ता २ जून १८०६ रोजी सुरू झाली होती. तिचे २ जानेवारी १८०९ रोजी बँक ऑफ बंगालमध्ये रुपातंर झाले. १५ एप्रिल १८४० रोजी बँक ऑफ बॉम्बे आणि १ जुलै १८४३ रोजी बँक ऑफ मद्रासची स्थापना झाली. बँक ऑफ बॉम्बे आणि बँक ऑफ मद्रास या त्या काळातील प्रमुख बँका होत्या. बँक ऑफ बॉम्बे आणि बँक ऑफ मद्रास यांचे २७ जानेवारी १९२१ रोजी बँक ऑफ बंगालमध्ये विलीनीकरण झाले. तिन्ही बँका मिळून इंपीरियल बँक ऑफ इंडिया तयार करण्यात आली.

**एसबीआयच्या लोगोविषयी...**

१९५५ साली जेव्हा भारतीय स्टेट बँक अस्तित्वात आली. तेव्हा बँकेचा लोगो वटवृक्षाचे झाड होते. मात्र, १९७० मध्ये हा लोगो पूर्णपणे बदलण्यात आला. वटवृक्षाऐवजी, निळ्या रंगाचे वर्तुळ, ज्याच्या तळाशी एक लहान कट आहे, असा लोगो तयार करण्यात आला. हा लोगो अहमदाबाद नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईनच्या माजी विद्यार्थी असलेले शेखर कामत यांनी तयार केला होता. एसबीआयच्या नव्या लोगोची रचना ही गुजरातमधील कांकरिया तलावापासून प्रेरित असल्याचे काही जणांनी म्हटलं होते. एसबीआयचा लोगो हा कांकरिया तलावाचा नकाशाप्रमाणे असल्याचे काही जणांचे म्हणणे होते. मात्र, हे शेखर कामत यांनी हे नाकारले.

देश स्वतंत्र झाल्याच्या सुमारे ८ वर्षांनंतर भारतीय स्टेट बँक अ?क्ट १९५५ अंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँकेने इंपीरियल बँक ऑफ इंडिया ताब्यात घेतली. यानंतर इंपीरियल बँक ऑफ इंडियाचे नाव बदलले आणि १ जुलै १९५५ रोजी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया अस्तित्वात आली. १९६० मध्ये एसबीआयने ७ बँकांचे नियंत्रण संपादन केले. या सर्व पूर्वीच्या वेगवेगळ्या राज्यांच्या बँका होत्या. ज्याचे नाव आणि लोगो स्टेट बँक ऑफ इंडियाच्या धर्तीवर ठेवले. या सहयोगी बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ बीकानेर अ?ण्ड जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ इंदूर, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ पटियाला, स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र आणि स्टेट बँक ऑफ त्रावणकोर यांचा समावेश आहे. १ एप्रिल २०१७ रोजी या बँका स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाल्या.

**मुख्यालय :** नरीमन पॉईंट, मुंबई (महाराष्ट्र) स्वामित्व : ही भारत सरकारची सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठी बँक आहे. शाखा आणि कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या दृष्टीने ही जगातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक आहे. तीन प्रेसिडेन्सी बँकांची स्थापना (१८०६ - १८४३) या बँकेची पाळेमुळे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात रोवली गेली. भारताचा व्यापार सांभाळण्यासाठी ब्रिटिशांनी तीन वेगवेगळ्या प्रांतांत तीन प्रमुख बँका (ज्यांना 'प्रेसिडेन्सी बँका' म्हटले जाई) सुरू केल्या.

१) बँक ऑफ कलकत्ता : २ जून १८०६ रोजी स्थापना झाली, जिचे नाव नंतर 'बँक ऑफ बंगाल' करण्यात आले.

२) बँक ऑफ बॉम्बे : १५ एप्रिल १८४० रोजी मुंबईत स्थापना झाली. ३) बँक ऑफ मद्रास : १ जुलै १८४३ रोजी चेन्नई (मद्रास) येथे स्थापना झाली.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी (इम्पीरियल बँक)**

एसबीआयचा इतिहास २०० वर्षांपेक्षा जास्त जुना आहे. ब्रिटिशांच्या काळात १८०६ मध्ये 'बँक ऑफ कलकत्ता' (नंतर 'बँक ऑफ बंगाल') सुरू झाली. त्यानंतर 'बँक ऑफ बॉम्बे' (१८०४) आणि 'बँक ऑफ मद्रास' (१८४३) या तीन प्रेसिडेन्सी बँका स्थापन झाल्या. २७ जानेवारी १९२१ रोजी या तिन्ही बँकांचे विलीनीकरण करून 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया'ची स्थापना करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर, ग्रामीण पत पाहणी समितीच्या शिफारशीनुसार भारत सरकारने १ जुलै १९५५ रोजी 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया'चे राष्ट्रीयीकरण केले. या राष्ट्रीयीकरणानंतर तिचे नामकरण 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे करण्यात आले.

**इम्पीरियल बँक ऑफ इंडियाचा उदय (१९२१) :** पहिल्या महायुद्धानंतर देशातील बँकिंग व्यवस्था मजबूत करण्यासाठी ब्रिटिशांनी २७ जानेवारी १९२१ रोजी वरील तिन्ही प्रेसिडेन्सी बँकांचे विलीनीकरण केले. या एकत्रिकरणातून 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया' अस्तित्वात आली. १९३५ मध्ये 'भारतीय रिझर्व्ह बँक'ची स्थापना होईपर्यंत ही इम्पीरियल बँकच भारताची मध्यवर्ती बँक म्हणून काम पाहत होती. राष्ट्रीयीकरण आणि 'एसबीआय' चा जन्म (१९५५) भारत स्वतंत्र झाल्यानंतर ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्यासाठी एका मोठ्या सरकारी बँकेची गरज होती. त्यानुसार, 'गोरवाला समिती' (ग्रामीण पत पाहणी समिती) च्या शिफारशीवरून भारत सरकारने १ जुलै १९५५ रोजी 'इम्पीरियल बँक ऑफ इंडिया'चे राष्ट्रीयीकरण केले. याच दिवशी या बँकेचे नाव बदलून 'स्टेट बँक ऑफ इंडिया' (भारतीय स्टेट बँक) ठेवण्यात आले.

**सहयोगी बँकांचे विलीनीकरण (१९५९ आणि २०१७) १९५९ चा कायदा :** १९५९ मध्ये केंद्र सरकारने एक कायदा करून संस्थानांच्या ताब्यातील ८ बँकांना एसबीआयच्या सहयोगी बँका बनवले.

**महा-विलीनीकरण (२०१७) :** १ एप्रिल २०१७ रोजी एसबीआयने आपल्या ५ सहयोगी बँका (उदा. स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर, स्टेट बँक ऑफ हैदराबाद, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, स्टेट बँक ऑफ पतियाळा) आणि 'भारतीय महिला बँक' यांचे पूर्णपणे स्वतःमध्ये विलीनीकरण केले. यामुळे एसबीआय जगातील सर्वात मोठ्या बँकांच्या यादीत सामील झाली.

आजची आधुनिक एसबीआय (२०२६ मधील स्थिती)

आज एसबीआय केवळ भारतातीलच नव्हे, तर जगातील एक वित्तीय महासत्ता बनली आहे. सध्या बँक ५२ कोटींहून अधिक ग्राहकांना सेवा देत असून तिचे जाळे २३,००० पेक्षा जास्त शाखा आणि ६०,००० हून अधिक एटीएमसह जगभरातील २९ देशांमध्ये पसरले आहे. 'वायओएनओ' सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे ही बँक आज पूर्णपणे हायटेक झाली आहे.

# तुकाराम मुंढे साहेब...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

तुकाराम मुंढे हे शिस्त, कडक, नियम व कायद्यासाठी प्रसिध्द आहेत. ज्या विभागात गेले त्या विभागात ते कायद्याने काम करून सर्वसामान्यांचा फायदा करतात मात्र, अकोला - वाशीम जिल्ह्यात त्यांच्या याच गोष्टीचा फायदा घेत भ्रष्टअधिकाऱ्यांनी कारवाईच्या नावाखाली छोट्या दुकानदारांकडून लूट सुरू केली आहे. यासाठी दलालही नेमले आहेत. अकोला - वाशीम जिल्ह्यात अन्न व प्रशासन विभागाने एकही ठोस मोठी कारवाई न करता निव्वळ वसुलीचाच धंदा सुरू केला आहे. महाराष्ट्रभर अन्न व औषध प्रशासन (इईँ) विभागाकडून भेसळयुक्त अन्नपदार्थ, अवैध गुटखा विक्री आणि मेडिकलमधील अनियमिततेविरोधात तुकाराम मुंढे यांनी धडक मोहीम सुरू केली आहे. राज्यभरात कारवायाचा धडाका सुरू आहे. मात्र भ्रष्टाचाराने बरबटून पोखरून वाळवी लागलेल्या वाशीमच्या अन्न व प्रशासन विभागाच्या कारवाया कमी वसुलीच जास्त सुरू आहे. राज्यभरातील तुकाराम मुंढे यांच्या कारवायामुळे माफियांनी धास्ती घेतली असून अनेकांची मस्ती उतरली आहे. याच गोष्टीचा फायदा घेत औषध प्रशासन विभागाचा मोरक्या दलालामार्फत वसुलीसाठी बुलढाणा व वाशीम जिल्ह्यात गिरक्या घालत आहे.

# औषध प्रशासनाचा मोरक्या, वसुलीसाठी घालतो गिरक्या !

## * एकही ठोस कारवाई नाही, फक्त वसुलीची घाई...








कडक शिस्त आणि प्रामाणिक कारभारासाठी ओळख असलेल्या तुकाराम मुंढे यांच्या नावामुळे जनतेमध्येही आता व्यवस्था बदलेल, अशी अपेक्षा निर्माण झाली आहे.मात्र, याच मोहिमेच्या आड काही ठिकाणी वेगळाच खेळ सुरू असल्याचे आरोप आता समोर येत आहेत. कारवाईच्या नावाखाली काही अधिकारी-कर्मचारी आपलीच खासगी वसुलीची 'व्यवस्था' मजबूत करत असल्याची चर्चा रंगत आहे. मुंढे साहेबांच्या कडक प्रतिमेचा आधार घेऊन जर कुणी स्वतःचे आर्थिक गणित जुळवत असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.तपासणीपूर्वीच माहिती पोहोचते का? काही ठिकाणी कारवाई फक्त कागदावरच होते का? भेसळ करणारे आणि नियम मोडणारे लोक वारंवार वाचतात कसे? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.अन्नपदार्थांच्या तपासणीपासून गुटखा विक्रीपर्यंत जर यंत्रणेतील काही घटक आणि अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये संगनमत असेल, तर हा थेट जनतेच्या आरोग्याशी खेळ आहे. कारण भेसळयुक्त अन्नाचा फटका सामान्य नागरिकांना बसतो, तर गैरप्रकार करणारे मात्र मोकाट फिरतात.गुटखा विक्रीवर कारवाईचे आदेश निघतात, धाडींची चर्चा होते; पण काही ठिकाणी कारवाईपूर्वीच हालचाली थांबतात, अशी चर्चा का होते? याचे उत्तर प्रशासनाने शोधण्याची वेळ आली आहे.मोठमोठ्या घोषणा, धडक मोहिमा आणि प्रसिद्धीपेक्षा आता गरज आहे ती प्रत्यक्ष परिणामांची. दोषींवर कठोर कारवाई झाली नाही तर अशा मोहिमा फक्त कागदावरच राहतील.मुंढे साहेब, तुमच्या नावावर जर कुणी यंत्रणेचा गैरफायदा घेत असेल, तर त्या प्रवृत्तीला आळा घालणे आवश्यक आहे. प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या प्रतिमेचा वापर करून जर भ्रष्टाचाराला खतपाणी मिळत असेल, तर ही संपूर्ण व्यवस्थेची हार ठरेल. अकोला- वाशीम बुलढाणा जिल्ह्यातील भ्रष्ट अन्न व औषध प्रशासन अधिकाऱ्यांनी कारवाई करण्याऐवजी तुकाराम मुंढे यांच्या नावावर मोठ्या माफियांना सोडून छोट्या दुकानदाराकडून व मेडीकल वाल्यांकडून दलालामार्फत थेट वसुली सूरू केली आहे. हे दलाल खासगी असून यांचे अधिकाऱ्यांची थेट संबंध आहेत.

त्यामुळे तुकाराम मुंढे यांच्या नावाचा गैरवापर करून भ्रष्टाचार करणाऱ्या अशा भ्रष्टअधिकाऱ्यांवरही कारवाई करावी त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी त्यांच्या कामाचा मागील लेखाजोखा तपासावा त्यामुळे सत्य समोर येवून भ्रष्टअधिकारी उघडे पडतील. व छोट्या दुकानदारांना त्रास होणार नाही.




### भ्रष्टअधिकाऱ्यावर कारवाई करा - गोविंद वर्मा

**आतापर्यंत जिल्ह्यात एकही ठोस कारवाई न करता थेट दरमहा वसुली करणाऱ्या भ्रष्टअधिकाऱ्यावर विभागीय चौकशी लावून त्यांच्या मालमत्तेचीही चौकशी करावी त्याच्यावर निलंबनाची कारवाईही करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे शहराध्यक्ष गोविंद वर्मा यांनी निवेदनाद्वारे मंत्री झरवाळ व तुकाराम मुंढे यांच्याकडे केली आहे.**

## थोडक्यात

### कृषी सप्ताहनिमित्त घोटा जि.प.शाळेत वृक्षारोपण !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

हरित क्रांतीचे प्रणेते व माजी. मुख्यमंत्री डॉ. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने घोटा येथील संगमेश्वर शेतकरी गटाद्वारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटा येथे दि.०१ ते ०७ जुलै २०२६ या कालावधीत कृषी सप्ताहानिमित्त जिल्हा परिषद शाळेत व संगमेश्वर शेतकरी गटाच्या वतीने यांच्याकडून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शेतकरी उत्पादन गटाचे निमंत्रक किशोर मोरे यावेळी उपस्थित सरपंच अनिल मोरे, सुनील मोरे, गजानन मोरे, सुनील लोखंडे, आदित्य मोरे,किशोर मोरे, दिपक मापारी, बळीराम मोरे, संदीप अवचार, विजय मोरे, निलेश गोडघासे, किसन शेंडगे,यांनी विशेष परिश्रम घेतले.

### झोलेबाबा विद्यालयात प्रवेशोत्सव



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

परमहंस झोलेबाबा विद्यालय तथा स्व. मधुकरराव ल. सपकाळ कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, पिंप्री (अवगण) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ चा प्रवेशोत्सव मंगळवार, दि. ३० जून २०२६ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी मागील वर्षातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच नवोदित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव तथा प्राचार्य मा. श्री. सुनिलजी सपकाळ साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नियमित उपस्थिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त, नैतिक मूल्ये आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. शिक्षणाबरोबरच विविध शालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.या प्रवेशोत्सवामुळे नवागत विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साह, आनंद आणि प्रेरणादायी वातावरणात झाली.

### रमेश मुंजे यांनी केले शालेय साहित्याचे वाटप

**मंगरूळपीर :** येथील कलंदरी उर्दू हायस्कूलची विद्यार्थिनी माजी नगरसेवक सय्यद आजम यांची नात माहीम फलक हिने दोन वर्षापूर्वी दैनिक सिटी न्यूज सुपर फास्ट नी चित्र रंगवा स्पर्धा आयोजित केली होती त्या स्पर्धेमध्ये भाग घेऊन चित्राचे एकूण संग्रह तयार करून सहभाग नोंदविला होता व सिटी न्यूज अकोला कार्यालयाला पाठविण्यात आले होत. माहीम फलक हिने माझे बक्षीस आले त्यामुळे यावर्षीही सिटी न्युज सुपरफास्टचे तालुका प्रतिनिधी रमेश मुंजे यांनी शालेय साहित्य वाटप करून सन्मान केला. मागील वर्षाच्या बक्षीसाची आठवण काढल्यामुळे कुमारी माहीम फलकला सिटी न्युज चे प्रतिनिधी रमेश मुंजे यांनी सिटी न्यूज परिवारा मार्फत देण्यात येणारे बक्षीस म्हणून तिला सहा नोटबुक्स देऊन तिचा सन्मान यांनी केला.

# अहवाल गेला वरिष्ठांकडे... कारवाई मात्र अजूनही कागदावर !

## केनवडमधील जैविक कचरा प्रकरणात उपकेंद्राचा अहवाल; कारवाई कधी, नागरिकांचा सवाल

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

केनवड येथील एका खासगी दवाखान्याकडून घातक जैविक वैद्यकीय कचरा उघड्यावर टाकला जात असल्याची माहिती स्थानिक ग्रामीण आरोग्य उपकेंद्राने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवालाद्वारे पोहोचविल्याचे समोर आले आहे. मात्र अहवाल पाठविल्यानंतरही या प्रकरणात कोणती ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नसल्याने आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे 'अहवाल असूनही कारवाई का नाही?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.



नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वापरलेल्या सलाईनच्या बाटल्या, इंजेक्शनच्या सुया, सिरिंज, काचेच्या औषधांच्या शिश्या व इतर जैविक कचरा उघड्यावर आढळल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेष म्हणजे हा परिसर राष्ट्रीय महामार्गालगत असून बँका, सेतू केंद्र, एसटी बसथांबा आणि ग्रामीण आरोग्य उपकेंद्राजवळ असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते.या प्रकरणाची माहिती संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली असल्याचे सांगितले जात असतानाही नियमभंगाची चौकशी, नोटीस किंवा दंडात्मक कारवाईबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे 'अहवालानंतरही कारवाई का झाली नाही?' हा प्रश्न अधिक तीव्र झाला असून नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.जैविक वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लावणे कायद्याने बंधनकारक आहे. अशा कचऱ्याची उघड्यावर विल्हेवाट लावल्याचा आरोप होत असताना आणि त्याबाबत वरिष्ठांना अहवालही सादर झाल्याचे सांगितले जात असताना,




त्यानंतरही कारवाई न झाल्याने आरोग्य विभागाच्या देखरेखीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जाहीर करावी, नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितांवर तातडीने नियमानुसार कठोर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# जिल्ह्यातील १० लाख २० हजार २०८ मतदारांची घराघरांत जाऊन पडताळणी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेला वाशिम जिल्ह्यात प्रत्यक्ष प्रारंभ झाला असून, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी स्वतः गणनापत्र (एन्युमरेशन फॉर्म) भरून या मोहिमेची सुरुवात केली. यावेळी त्यांनी नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना अचूक व संपूर्ण माहिती देऊन या लोकशाही प्रक्रियेला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

जिल्ह्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येत असून, सुमारे १० लाख २० हजार २०८ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष घराघरांत जाऊन पडताळणी केली जाणार आहे. यासाठी १,१०० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), १०३ बीएलओ पर्यवेक्षक, तीन मतदार नोंदणी अधिकारी आणि ४२ सहायक मतदार



नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले की, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नागरिकांच्या घरी भेट देऊन अंशतः भरलेले गणनापत्र दोन प्रतींमध्ये उपलब्ध करून देतील. नागरिकांनी त्यामधील माहितीची काळजीपूर्वक पडताळणी करून आवश्यक दुरुस्त्या कराव्यात, दोन्ही प्रतींवर स्वाक्षरी करून अद्ययावत छायाचित्रासह संबंधित बीएलओकडे जमा कराव्यात. हा फॉर्म अतिशय सोपा असून अल्पावधीत भरता येतो. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा. यावेळी सहायक मतदान नोंदणी अधिकारी निलेश पळसकर व अभिजित देवगीरकर, पर्यवेक्षक सुभाष जवंजाळ, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी सुधीरकुमार डवले, तंत्रज्ञ अजय बांडे आदी उपस्थित होते.




# दिखावा म्हणून कागदोपत्री... नाले करतात 'साफ', तेही 'हाप'!

## भ्रष्टधिकाऱ्यांचं पाप, जनता करणार नाही माप...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शहरातील नाल्यांची साफसफाई नियमीत करण्यात येत नाही . पावसाळ्याच्या तोंडावर दिखावा म्हणून तातपुर्ती कागदोपत्री नाले सफाई करतात तेही अर्धवट केल्याने नाली काटच्या पुराचे व नाल्याचे पाणी घरात घुसल्यामुळे घाण पाण्याचा त्रास नागरिकांना होत आहे. नियमित नाले सफाई झाली तर पुराच्या धोक्यापासून नाल्याकाठील रहिवाशांचा बचाव होतो. मात्र पालिकेने अद्यापही शहरातील नाल्यांची साफसफाई करण्याची मोहिम हाती घेतली नसल्याने बालाजी मंदिर मागील भाग, डोहर पुरा, गवळीपुरा, गोंदेश्वर, विटाळी तलाव आदि परिसरातील नागरिकांनी नाले साफसफाई करण्याची मागणी केली आहे.मात्र, नाली सफाई नसल्याने नाल्या गटारगंगा बनल्या असून शहरात नाली भवताल जिकडे तिकडे चौहीकडे घाणच घाण पसरली आहे तर नगर पालिका ही भ्रष्टाचाराने आखडली असून नाली सफाई रखडली आहे.





मागील वर्षी पहिल्याच पावसाने कहर करुन नाल्याकाठी राहत असलेल्या अनेकांच्या घरात पाणी शिरल्याने घरांची पडझड झाली होती. याच बरोबर बहुतांश गोरगरिब नागरिकांच्या घरातील भांडेकुंडी पावसात वाहून गेली होती. गवळीपुरा, सिंदखाना, खाटीकपुरा, डोहरपुरा, विटाळी तलाव या परिसरात पावसाने कहर केला होता. बऱ्याच नागरिकांना त्या वेळी न. प. शाळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने आश्रय देण्यात आला होता. दरवर्षी पावसाळा लागण्यापुर्वीच नाले सफाई मोहिम हाती घेण्यासाठी नगर परिषद प्रयत्न करीत असते. मात्र यावर्षी अद्यापही पालिकेने शहरानजिकच्या नाले सफाई मोहिम सुरु केली नाही. खरे पाहता पावसाळा सुरु झालेला आहे. जून महिना असल्याने केव्हाही पाऊस येऊन नाल्यांना पुर येऊ शकतो. यासाठी पालिकेच्या आरोग्य विभागाने लक्ष देण्याची मागणी शहरातील नागरिकांनी केली आहे इनामदारपुरा, मंगळवारीवेश, लोखंडे पुल, शिवाजी चौक, भवानी नगर, डोहरपुरा, देवपेठ शाळेजवळील भाग, विटाळी तलाव, गवळीपुरा, सिंदखाना, खाटीकपुरा, आदि परिसरात येणाऱ्या नाल्यांची साफसफाई करणे गरजेचे आहे. याबाबत नगर पालिकेने त्वरीत लक्ष द्यावे अन्यथा पावसाळा आल्यानंतर नेहमीप्रमाणेच नगर परिषद नाले साफसफाई मोहिम हाती घेईन. मात्र तोपर्यंत नाल्यांच्या काठांवर वसलेल्या गोरगरिबांची घरे वाहून गेल्याशिवाय राहणार नाही.


# अहवाल गेला वरिष्ठांकडे... कारवाई मात्र अजूनही कागदावर !

## केनवडमधील जैविक कचरा प्रकरणात उपकेंद्राचा अहवाल; कारवाई कधी, नागरिकांचा सवाल

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

केनवड येथील एका खासगी दवाखान्याकडून घातक जैविक वैद्यकीय कचरा उघड्यावर टाकला जात असल्याची माहिती स्थानिक ग्रामीण आरोग्य उपकेंद्राने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अहवालाद्वारे पोहोचविल्याचे समोर आले आहे. मात्र अहवाल पाठविल्यानंतरही या प्रकरणात कोणती ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नसल्याने आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे 'अहवाल असूनही कारवाई का नाही?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वापरलेल्या सलाईनच्या बाटल्या, इंजेक्शनच्या सुया, सिरिंज, काचेच्या औषधांच्या शिश्या व इतर जैविक कचरा उघड्यावर आढळल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. विशेष म्हणजे हा परिसर राष्ट्रीय महामार्गालगत असून बँका, सेतू केंद्र, एसटी बसथांबा आणि ग्रामीण आरोग्य उपकेंद्राजवळ असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते.या प्रकरणाची







माहिती संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली असल्याचे सांगितले जात असतानाही नियमभंगाची चौकशी, नोटीस किंवा दंडात्मक कारवाईबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

# जिल्ह्यातील १० लाख २० हजार २०८ मतदारांची घराघरांत जाऊन पडताळणी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेला वाशिम जिल्ह्यात प्रत्यक्ष प्रारंभ झाला असून, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी स्वतः गणनापत्र (एन्युमरेशन फॉर्म) भरून या मोहिमेची सुरुवात केली. यावेळी त्यांनी नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना अचूक व संपूर्ण माहिती देऊन या लोकशाही प्रक्रियेला सहकार्य करण्याचे आवाहन केले.

जिल्ह्यात ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहीम राबविण्यात येत असून, सुमारे १० लाख २०





हजार २०८ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष घराघरांत जाऊन पडताळणी केली जाणार आहे. यासाठी १,१०० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), १०३ बीएलओ पर्यवेक्षक, तीन मतदार नोंदणी अधिकारी आणि ४२ सहायक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी सांगितले की, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नागरिकांच्या घरी भेट देऊन अंशतः भरलेले गणनापत्र दोन प्रतींमध्ये उपलब्ध करून देतील.

